॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

*** सुविचार ***
कष्ट आणि प्रामाणिक प्रयत्नांशिवाय आयुष्यात कधीही यश मिळत नाही.

■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. २१ जून २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक २० वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

## SPOT NEWS

### राम मंदिर वादाचा परिणाम; देणगीत ८० टक्के घट

**● अयोध्या –** अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी मंदिर पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. यावेळी कारण आहे मंदिराशी संबंधित कथित गैरव्यवहार प्रकरण. या प्रकरणाची चौकशी सुरू असतानाच मंदिरात येणा-या देणगीच्या रकमेत मोठी घट झाल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे रामभक्तांमध्ये चिंता आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. मंदिराशी संबंधित सूत्रांच्या माहितीनुसार, गेल्या काही महिन्यांपर्यंत दरमहा सरासरी सुमारे ७ कोटी रुपयांची देणगी मंदिराला मिळत होती. मात्र अलीकडच्या काळात ही रक्कम घटून सुमारे दीड कोटी रुपयांपर्यंत आल्याचे सांगितले जात आहे. हे आकडे खरे ठरल्यास देणगीत जवळपास ८० टक्क्यांची घट झाल्याचे चित्र आहे. राम मंदिर हे कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचे केंद्र मानले जाते. त्यामुळे मंदिरातील देणगी व्यवस्थापनाबाबत गैरव्यवहाराच्या चर्चा सुरू झाल्यानंतर अनेक भाविकांनी नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे. देणगीची रक्कम कशी हाताळली जाते, तिचा वापर कुठे होतो आणि त्यात पारदर्शकता आहे का, असे प्रश्न आता अधिक तीव्रतेने विचारले जात आहेत. दरम्यान, स्थानिक माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या काही अहवालांमुळे या वादाला आणखी हवा मिळाली आहे. चौकशीदरम्यान देणगी मोजणीशी संबंधित काही सीसीटीव्ही फुटेज हटवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. हे फुटेज तांत्रिक कारणामुळे नष्ट झाले की जाणीवपूर्वक डिलीट करण्यात आले, याचा तपास सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

### उद्यापासून विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन

**● मुंबई –** ऑपरेशन टायगरमुळे तापलेल्या राजकीय वातावरणात सोमवारी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात होत आहे. पावसाने दडी मारल्याने राज्यात निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती, तीव्र पाणी टंचाई, शेतकरी कर्जमाफी योजनेतील जाचक अटी, पुण्यातील विषारी दारूने घेतलेले बळी, अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाला होत असलेला विरोध आदी विषयावर सरकारला घेरण्याची तयारी विरोधकांनी केली असून, पावसाळी अधिवेशन वादळी ठरण्याची चिन्हे आहेत. शिवसेना ठाकरे गटातील खासदार फुटीचे पडसाद अधिवेशनात उमटण्याची शक्यता आहे.

# कोर्टाच्या निकालानंतर ऑपरेशन टायगर फसणार

## ओमराजे अद्याप शिंदे गटात जाणार नाहीत । फुटलेल्या पाच खासदारांची धाकधूक वाढली

**● धाराशिव । वीरभूमी –**
पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरणात आज सीबीआय विशेष न्यायालयाने निकालाचे वाचन केले. यावेळी न्यायालयाने सबळ पुराव्याअभावी सर्व ९ आरोपींची निर्दोष मुक्तता केली. हा ओमराजे निंबाळकर यांना मोठा धक्का मानला जात आहे. त्यावर आता ओमराजे निंबाळकर यांची प्राथमिक प्रतिक्रिया आली आहे.

ओमराजे निंबाळकर यांनी एका वाक्यात प्रतिक्रिया दिली असून त्यांनी निकाल दुर्दैवी आहे. उच्च न्यायालयात जाणार असल्याचे सांगितले. त्यानंतर ओमराजे निंबाळकर यांनी आपली राजकीय भूमिका देखील बदलत आपण तूर्तास शिंदे गटात जाणार नाही. याचा निर्णय मतदार संघात जाऊनच दोन दिवसांत घेण्यात येईल असे सांगितले.

दरम्यान, ज्यावेळी निकाल जाहीर झाला त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कोल्हापुरात होते. त्याचबरोबर तिथे अंबाबाई मंदिर विकास कामांचे उद्घाटन करण्याच्या कार्यक्रमात अमित शहा देखील उपस्थित होते. यावेळी एकनाथ शिंदे हे फोनवर



बोलत बाहेर पडताना दिसले. पवनराजे हत्या प्रकरणाचा निकाल आल्यानंतर या तिघांची बैठक झाली. त्यात अमित शहा यांनी केंद्रीय गृहमंत्री, सीबीआयला या प्रकरणी वरिष्ठ न्यायालयात दाद मागण्यासंदर्भात कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

आता या निकालानंतर ओमराजे निंबाळकर यांनी आपली राजकीय भूमिका बदलल्याचे सांगण्यात येत आहे. शिंदे गटाच्या वाटेवर असलेले ओमराजे निंबाळकर हे तूर्तास तरी शिंदे गटात जाणार नसल्याचे सांगण्यात येत आहे. ते याबाबतचा निर्णय मतदार संघात जाऊनच घेणार आहेत. विशेष म्हणजे ओमराजे निंबाळकर यांनी आपल्या ट्विटर हँडलवरील उद्धव ठाकरेंचा फोटो हटवलेला नाही.

### पवनराजे निंबाळकर हत्याकांड प्रकरणी एकनाथ शिंदे ॲक्शन मोडमध्ये

■ मुंबई सत्र न्यायालयाने पुरावे आणि साक्षीदारांच्या अभावामुळे सर्व आरोपींची सुटका केल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. या निकालानंतर लगेचच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या संपूर्ण प्रकरणावर सखोल चर्चा केली.
या उच्चस्तरीय बैठकीत खटल्याच्या कायदेशीर बाजू आणि पुराव्यांवर पुनर्विचार करण्यात आला. या चर्चेनंतर गृहमंत्री अमित शहा यांनी या निकालाला वरिष्ठ न्यायालयात आव्हान देण्याचे आणि भक्कमपणे बाजू मांडण्याचे आदेश तपास यंत्रणेला दिले आहेत. तत्कालीन काँग्रेस (आय) पक्षाचे नेते पवनराजे निंबाळकर यांची ३ जून २००६ रोजी नवी मुंबईत भरदिवसा गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या हल्ल्यात त्यांचे वाहनचालकही मृत्युमुखी पडले होते. या दुहेरी हत्याकांडाने राज्यभरात मोठी खळबळ उडाली होती.
या प्रकरणाच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला होता. या निकालानंतर ठाकरे गटाचे राज्यसभा खासदार अनिल देसाई यांनी बंडखोर खासदार ओमराजे निंबाळकर यांच्याबाबत महत्त्वपूर्ण विधान करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली. ओमराजे निंबाळकर यांचा विश्वासघात झाला आहे. त्यांना पुन्हा आमच्यासोबत यायचं असेल तर त्याबाबतचा अंतिम निर्णय पक्षप्रमुख उद्धव ठाकरे घेतील, असे देसाई यांनी स्पष्ट केले.

### ओबीसी जनगणनेसाठी राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

**● मुंबई । वीरभूमी –**
ओबीसी समाजाच्या स्वतंत्र जनगणनेपासून ते राज्यातील संभाव्य दुष्काळ, वाढती गुन्हेगारी आणि विरोधी पक्षांवरील कथित दबाव अशा विविध मुद्यांवर काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर जोरदार टीका केली.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, ओबीसी समाजाची स्वतंत्र जनगणना हा केवळ सामाजिक नव्हे तर घटनात्मक हक्कांचा प्रश्न आहे. आरक्षणाचे संरक्षण आणि समाजाच्या वास्तविक लोकसंख्येची नोंद होण्यासाठी स्वतंत्र ओबीसी जनगणना अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी सांगितले की, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सातत्याने हा मुद्दा लावून धरल्यामुळे केंद्र सरकारला ओबीसी जनगणनेबाबत भूमिका घ्यावी लागली. मात्र, प्रस्तावित जनगणनेत स्वतंत्र ओबीसी कॉलम नसल्याने समाजाच्या हक्कांवर गदा येण्याची भीती आहे. यासंदर्भात लवकरच ओबीसी संघटनांची बैठक आयोजित केली जाणार असून राज्यभर जनजागृती आणि आंदोलनाची दिशा निश्चित केली जाणार असल्याचेही वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

राज्यातील पावसाची अनिश्चितता आणि एल-निनोच्या संभाव्य परिणामांबाबत चिंता व्यक्त करत वडेट्टीवार यांनी सरकारला इशारा दिला. त्यांनी सांगितले की, धरणांमधील घटता पाणीसाठा, मराठवाड्यासह अनेक भागांतील गंभीर परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या वाढत्या अडचणी लक्षात घेता सरकारने तातडीने सर्वपक्षीय बैठक बोलवली पाहिजे. पुढील काही दिवसांत समाधानकारक पाऊस झाला नाही, तर राज्यासमोर पिण्याच्या पाण्याचे मोठे संकट उभे राहू शकते. त्यामुळे सरकारने वेळ न दवडता ठोस नियोजन आणि कृति आराखडा जाहीर करावा, अशी मागणी त्यांनी केली.

देशातील राजकीय घडामोडींवर भाष्य करताना वडेट्टीवार यांनी सत्ताधा-यांवर गंभीर आरोप केले. विरोधी पक्ष कमकुवत करण्यासाठी लोकशाही संस्थांवर दबाव आणला जात असल्याचा दावा त्यांनी केला. देशात विरोधी पक्ष संपवण्याचे आणि एकपक्षीय व्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

### माहिती अधिकार कायद्यातील बदलाला अण्णा हजारेंचा विरोध; बदल केल्या आंदोलन करण्याचा दिला इशारा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
देशात आणि महाराष्ट्रात माहिती अधिकार कायदा अस्तित्वात येण्यात महत्त्वाची भूमिका असलेल्या ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी या कायद्यातील बदलांवर नाराजी दर्शवली आहे. राज्य सरकारने गेल्याच आठवड्यात एक राजपत्र काढून माहिती अधिकार कायद्यात काही महत्त्वाचे बदल केले आहेत. या बदलावर माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी आक्षेप नोंदवला असून आता ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी फडणवीस सरकारला उपोषणाचा इशारा दिला आहे.

शासनाने १२ जून रोजी माहिती अधिकार कायदा २००५ संदर्भात सुधारित अधिसूचना जारी केली आहे. मात्र, त्यास सामाजिक संघटनांनी विरोध दर्शवला आहे. माहिती अधिकार कायदा वापरताना



पूर्वीच्या नियमात बदल केल्याने राज्य सरकारवर नाराजी व्यक्त करत अण्णा हजारे यांनी उपोषणाचा इशारा दिला. माहिती अधिकार कायदा केल्यानंतर प्रथमच या कायद्याच्या अंमलबजावणीत बदल करण्यात आले आहेत. या कायद्यानुसार आतापर्यंत माहिती अधिकार कायद्याचा वापर करून माहिती मागवताना होणारा १० रुपयाचा खर्च आता ३० रुपये केला आहे. यासोबतच प्रथम अपील ५० रुपये तर दुसऱ्या अपिलासाठी शंभर रुपये शासनाकडे जमा करावे लागणार आहेत.

मिळालेल्या माहितीसाठी प्रतिपान २ रुपयावरून प्रतिपान ५ रुपये इतके शुल्क संबंधित विभागाकडून आकारले जाणार आहे. या नियमासह एकूण १२ नियम करण्यात आले आहेत. या नियमांमुळे सामान्य नागरिकांना माहिती मिळवणे अशक्य होणार आहे. त्यामुळे अण्णांनी नाराजी व्यक्त केली.

माहिती अधिकार हा मूलभूत अधिकार आहे, पैसे कमावण्याचे साधन नाही. काही लोक याचा गैरफायदा घेतात. त्यामुळे शुल्क आकारणे गरजेचे आहे. मात्र, यातून पैसे कमावणे हा उद्देश नसावा, असे अण्णांनी म्हटले. फडणवीस सरकारने केलेले बदल पुन्हा पूर्ववत केले नाही तर आपण उपोषण करणार असल्याचे अण्णा म्हणाले.

# पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांडातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता

## माजी गृहमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यासह आठ आरोपी निर्दोष । निकालाने निंबाळकर कुटुंबाला धक्का

**● मुंबई । वीरभूमी –**
तब्बल दोन दशकांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात आणि न्यायव्यवस्थेत चर्चेचा विषय ठरलेल्या पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांड प्रकरणाचा अखेर निर्णायक शेवट झाला आहे. सीबीआय विशेष न्यायालयाने माजी गृहमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व आठ आरोपींची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करत खटल्याला अनपेक्षित कलाटणी दिली. न्यायमूर्ती एस. आर. नावंदर यांनी दिलेल्या या निकालामुळे निंबाळकर कुटुंबाला मोठा धक्का बसला असून, राज्यातील राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना तोंड फुटले आहे.

मुंबईतील सीबीआय विशेष न्यायालयाच्या कोर्ट क्रमांक ५५ मध्ये शुक्रवारी (२० जून २०२६) हा बहुप्रतीक्षित निकाल जाहीर करण्यात आला. निकालाच्या दिवशी न्यायालय परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. बिहारच्या तुरुंगातून आणण्यात आलेला मुख्य आरोपी आणि कथित शूटर पिंटू सिंग याला उशिरा न्यायालयात हजर करण्यात आल्याने काही काळ उत्सुकता आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, त्याच्या उपस्थितीपूर्वीच न्यायालयाने निकालवाचनास सुरुवात केली.

निकाल जाहीर करताना न्यायमूर्ती नावंदर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, न्यायालय भावना किंवा संशयाच्या आधारावर नव्हे, तर केवळ कायदेशीरदृष्ट्या सिद्ध झालेल्या पुराव्यांच्या आधारे निर्णय देते. एका लोकनेत्याची भरदिवसा गोळ्या झाडून हत्या होणे ही अत्यंत दुर्दैवी घटना असली, तरी दोष सिद्ध करण्यासाठी ठोस आणि निर्विवाद पुरावे आवश्यक असतात, असे त्यांनी नमूद केले.

या खटल्यातील सर्वात महत्त्वाचा आधार माफीचा साक्षीदार पारसमल जैन याची साक्ष होती. मात्र न्यायालयाने ही साक्ष अविश्वसनीय, विसंगत आणि संशयास्पद



ठरवली. न्यायालयाच्या निरीक्षणानुसार, जैनला सप्टेंबर २००९ मध्ये अनधिकृतपणे ताब्यात ठेवण्यात आले होते. त्याला पंधरा दिवस बेकायदेशीररित्या डांबून ठेवून मारहाण करण्यात आल्याचा आणि दबावाखाली कबुलीजबाब घेतल्याचा उल्लेखही निकालपत्रात करण्यात आला.

सरकारी पक्षाने ही बाब न्यायालयापासून लपविल्यामुळे संपूर्ण तपास प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे न्यायालयाने नमूद केले. तसेच, जैनने केवळ ५० हजार रुपयांसाठी हत्या केल्याचा दावा केला होता. मात्र त्याच्याकडे मोठी मालमत्ता, व्यवसाय आणि सोन्याची संपत्ती असताना एवढ्या कमी रकमेसाठी तो अशा गंभीर कटात सहभागी झाला असावा, हा दावा न्यायालयाला विश्वासार्ह वाटला नाही.

इतकेच नव्हे तर, हत्येच्या दिवशी तो मुंबईबाहेर कसा गेला याबाबत त्याने वेगवेगळ्या टप्प्यांवर चार भिन्न आणि परस्परविरोधी माहिती दिली होती. यामुळे त्याच्या संपूर्ण साक्षीवरच संशय निर्माण झाला.

निकालादरम्यान न्यायालयाने तपास यंत्रणांच्या कामकाजावरही कठोर टीका केली. या खटल्यातील एकाही आरोपीचा मोबाईल फोन जप्त करण्यात आला नव्हता किंवा त्यांचे कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) गोळा करण्यात आले नव्हते. आरोपी परस्पर संपर्कात होते की नाही, हे सिद्ध करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले तांत्रिक पुरावेच सादर करण्यात आले नाहीत, असे न्यायालयाने नमूद केले.

घटनाक्रमात अनेक दूरध्वनी संभाषणांचा उल्लेख असला, तरी पवनराजे निंबाळकर यांना आरोपींकडून थेट फोन आल्याचे कोणतेही ठोस पुरावे तपास यंत्रणांना सादर करता आले नाहीत. त्यामुळे कट सिद्ध करण्यासाठी आवश्यक असलेली पुराव्यांची साखळी अपुरी राहिल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले.

हत्येनंतर गुन्ह्यात वापरलेली कार जाळण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, पूर्णपणे जळून गेलेल्या वाहनाचा रंग पंचनाम्यात हिरवा कसा नमूद करण्यात आला, असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला. तपास अधिकाऱ्यांनी कागदपत्रांच्या आधारे रंगाची नोंद केल्याचे सांगितले असले तरी मूळ पुराव्यांच्या विश्वसनीयतेवर यामुळे प्रश्न निर्माण झाल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. याशिवाय घटनास्थळावरील वाहनाची स्थिती आणि प्रत्यक्षदर्शींच्या जबाबांमध्येही तफावत असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले.

SPOT NEWS

## केडगावच्या सरस्वती विद्यामंदिरात एआय तंत्रज्ञानाची नवी भरारी

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

केडगाव येथील डॉक्टर हेडगेवार शिक्षण प्रतिष्ठान संचलित सरस्वती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्या मंदिर येथे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी नवनीत एआय सिस्टीम उपलब्ध करून देण्यात आले. या अत्याधुनिक एआय प्रणालीचे उद्घाटन नगर केंद्राचे अध्यक्ष दादाराम ढवाण यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. यावेळी संस्थेचे कार्यवाह सोमनाथजी दिघे,संस्थेचे सहकार्यवाह डॉ. रवींद्र चोभे, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य दादासाहेब काजळे, शाळेचे मुख्याध्यापक संदीप भोर तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. नवीन सक्षम इंटरॅक्टिव्ह पॅनलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दृकश्राव्य पद्धतीने अध्यापन, शैक्षणिक व्हिडिओ, थेट प्रात्यक्षिके, ऑनलाइन अध्ययन साहित्य तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित विविध शैक्षणिक साधनांचा लाभ मिळणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांची आकलन क्षमता, सहभाग आणि अभ्यासातील रुची वाढण्यास मोठी मदत होणार आहे. यावेळी मनोगत व्यक्त करताना दादाराम ढवाण म्हणाले की, आजच्या आधुनिक युगात शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत गरजेचा आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या बरोबरीने मराठी माध्यमाच्या शाळांनीही आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून पुढे जाणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना काळानुरूप शिक्षण मिळावे आणि त्यांना जागतिक स्पर्धे साठी सक्षम बनवावे, या उद्देशाने सरस्वती विद्यामंदिरमध्ये एआय तंत्रज्ञानाची सुरुवात करण्यात आली आहे.

## नगर जिल्ह्यात आज नीट पुनर्परीक्षा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

राष्ट्रीय परीक्षा संस्थेमार्फत रविवार, दि. २१ जून २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील १२ परीक्षा केंद्रांवर नीट २०२६ पुनर्परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेसाठी जिल्ह्यातील एकूण ५ हजार ३८५ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत. परीक्षा दुपारी २ ते सायंकाळी ५.१५ या वेळेत होणार असून, दिव्यांग प्रवर्गातील पात्र उमेदवारांसाठी परीक्षा सायंकाळी ६.२० वाजेपर्यंत चालणार आहे. परीक्षेचे सुरळीत, पारदर्शक व गैरप्रकारमुक्त आयोजन करण्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग आणि राष्ट्रीय परीक्षा संस्था यांच्या माध्यमातून आवश्यक मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये १२ केंद्र अधीक्षक, १६ उपकेंद्र अधीक्षक, १६ निरीक्षक, २२५ कक्ष निरीक्षक, ३ एनटीए प्रतिनिधी तथा भरारी पथके, १२ कर्तव्य दंडाधिकारी, १०७ पोलीस कर्मचारी, २१ जिल्हा प्रशासनाचे अधिकारी - कर्मचारी आणि १२ वाहनचालक यांचा समावेश आहे. परीक्षेच्या दिवशी सर्व परीक्षा केंद्रांवर पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार असून, कर्तव्य दंडाधिकारी, निरीक्षक आणि भरारी पथकांमार्फत सातत्याने देखरेख ठेवली जाणार आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी परीक्षा केंद्रांच्या परिसरात आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या असून संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. उमेदवारांनी प्रवेशपत्रावरील सूचनांचे काटेकोर पालन करावे आणि परीक्षा केंद्रावर वेळेपूर्वी उपस्थित राहावे. उमेदवारांनी केवळ एनटीएने परवानगी दिलेल्या वस्तू, प्रवेशपत्र आणि वैध छायाचित्रयुक्त ओळखपत्र सोबत आणावे.सर्व उमेदवार, पालक आणि नागरिकांनी परीक्षा शांततापूर्ण व सुरळीत वातावरणात पार पडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# सुप्यात वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश; पाच महिलांची सुटका

**दोन हॉटेलवर पोलिसांचे छापे । चौघांना अटक, दोन मुख्य सूत्रधार फरार । ३७ हजारांचा मुद्देमाल जप्त**

**● पारनेर । वीरभूमी –**

जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत सुपा पोलीस ठाणे हद्दीतील दोन हॉटेलवर छापे टाकून वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश करण्यात आला. या कारवाईत पाच महिलांची सुटका करण्यात आली असून चार जणांना अटक करण्यात आली आहे. तर दोन मुख्य सूत्रधार फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या पथकाने ही कारवाई केली. स्थानिक गुन्हे शाखा आणि सुपा पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने गुरुवारी (दि. १९) सुपा हद्दीतील पळवे शिवारातील ओम साई हॉटेल आणि राखी पॅलेस लॉजिंग येथे छापे टाकले.



पोलिसांनी प्रथम बनावट ग्राहक पाठवून संबंधित ठिकाणी वेश्याव्यवसाय सुरू असल्याची खात्री केली. त्यानंतर छापा टाकून ओम साई हॉटेलमधून सुनिल लक्ष्मण खोले (रा. नारायणगव्हाण, ता. पारनेर) व विनोद विलास मिडाळेकर (मूळ रा. बेळगाव, सध्या रा. ओम साई हॉटेल, पळवे) यांना ताब्यात घेतले. यावेळी दोन महिलांची सुटका करण्यात आली. या प्रकरणातील संग्राम कांडेकर हा मुख्य आरोपी फरार आहे.

त्यानंतर राखी पॅलेस लॉजिंगवर छापा टाकण्यात आला. या कारवाईत दीपक सुनार आणि गोवर्धन ओमप्रकाश बुल या दोघांना ताब्यात घेण्यात आले. या ठिकाणाहून तीन महिलांची सुटका करण्यात आली. या प्रकरणातील वैभव साठे (रा. चास, ता. जि. अहिल्यानगर) हा आरोपी फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

या कारवाईदरम्यान आरोपींकडून एकूण ३७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्यामध्ये तीन मोबाईल फोन व रोख रकमेचा समावेश आहे.

याप्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ९९ तसेच स्त्रिया व मुलींच्या अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा, १९५६ अंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुपा पोलीस करीत आहेत.

ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीष भोये, पोलीस अंमलदार अतुल लोटके, विष्णू भागवत, गणेश लोंढे, बिरप्पा करमल, बाळासाहेब नागरगोजे, प्रकाश मांडगे, महिला पोलीस अंमलदार चिमा काळे तसेच सुपा पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संयुक्तरीत्या केली.

## पाथर्डीत बोलेरो पिकअपची चोरी; दीड लाखांचे वाहन अज्ञात चोरट्यांनी लंपास

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी तालुक्यातील तनपुरवाडी येथील व्यावसायिक नागनाथ कारभारी मोरे यांच्या मालकीची बोलेरो पिकअप अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली असून याप्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, तनपुरवाडी (ता. पाथर्डी) येथील नागनाथ कारभारी मोरे (वय ३८) यांनी पाथर्डी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मोरे हे टायर मेकॅनिकल व्यवसायासोबत शेतीही करतात. त्यांच्या मालकीची महिंद्रा कंपनीची बोलेरो पिकअप (क्र. एमएच-१७-एजी-८६८६) टायर वाहतुकीसाठी वापरली जात होती.



दि. १८ जून २०२६ रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास त्यांनी आपली बोलेरो पिकअप पाथर्डी येथील साईनाथ टायर रिमोल्डिंग दुकानासमोर उभी केली होती. त्यानंतर ते आपल्या राहत्या घरी तनपुरवाडी येथे गेले. दुसऱ्या दिवशी, दि. १९ जून रोजी सकाळी सुमारे ८.१५ वाजता ते वाहन आणण्यासाठी गेले असता पिकअप जागेवर आढळून आली नाही. परिसरात तसेच आजूबाजूच्या ठिकाणी शोध घेऊनही वाहनाचा कोणताही मागमूस लागला नाही.

चोरीस गेलेल्या वाहनाची अंदाजे किंमत १ लाख ५० हजार रुपये असून अज्ञात चोरट्यांनी मालकाच्या संमतीशिवाय अपहाराच्या उद्देशाने वाहन चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी पाथर्डी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. संबंधित वाहनाचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेजसह इतर तांत्रिक बाबींची पडताळणी करण्यात येत आहे.

## श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगाव शिवारात गावठी कट्टा बाळगणारे दोन आरोपी बेलवंडी पोलिसांकडून अटक

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगाव शिवार परिसरात गावठी कट्टा विक्रीसाठी आणणाऱ्या दोन आरोपींना बेलवंडी पोलिसांनी सापळा रचून अटक केली आहे. आरोपींकडून विनापरवाना गावठी कट्टा व जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.



याबाबत माहिती अशी की दि. १९ जून रोजी बेलवंडी पोलीस ठाणे हद्दीतील ढवळगाव शिवारात काही इसम गावठी कट्टा विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार प्रभारी पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर व त्यांच्या पथकाने ढवळगाव शिवारातील हॉटेल रिलॅक्स परिसरात सापळा रचला. संशयित आरोपींची माहिती घेतली असता संशयित आरोपींकडे गावठी कट्टा व जिवंत राऊंड असल्याची खात्री होताच पोलिसांनी त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांची चाहूल लागताच संबंधित दोघे आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले. पोलिसांनी पाठलाग करून त्यांना शिताफीने ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती घेतली असता आरोपी सचिन विलास शिंदे (वय ३५, रा. निंबवी, ता. श्रीगोंदा) याच्या ताब्यात विनापरवाना गावठी कट्टा आढळून आला. तसेच आरोपी दीपक सिताराम शिंदे (रा. ढवळगाव) याच्याकडून दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली.

पोलिसांनी आरोपींकडे चौकशी केली असता त्यांनी सदर गावठी कट्टा हा तुषार तांबे याच्याकडून विक्रीसाठी घेतल्याची कबुली दिली. याप्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास प्रभारी पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोनि. नंदकुमार सोनवलकर, भाऊसाहेब यमगर, धर्मराज दहिफळे, संदीप गवारे, भाऊसाहेब शिंदे, पो. ना. शरद गांगर्डे, पोकॉ. कैलास शिपणकर, दादासाहेब क्षीरसागर, विकास सोनवणे, राजू भोर तसेच होमगार्ड सचिन काळाने, राहुल दिघे, राहुल धायगुडे, राहुल मासाळ, विशाल पवार आणि हनुमंत खोमणे यांनी पार पाडली.

# उत्तम आरोग्यासाठी योग ही भारताची विश्वाला देणगी

**जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील । केंद्रीय संचार ब्यूरो, माजी सैनिक आप्पा घोडके स्मृती प्रतिष्ठान आणि सूर्यतेज संस्थेच्या वतीने योग प्रशिक्षण कार्यक्रम**

**● शिर्डी । वीरभूमी –**

योग ही भारताने विश्वाला दिलेली अमूल्य देणगी असून उत्तम आरोग्यासाठी विद्यार्थ्यांनी मोबाईलपासून दूर राहून दररोज योगाभ्यास करावा आणि मैदानी खेळांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील यांनी केले.

भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयांतर्गत केंद्रीय संचार ब्यूरो, अहिल्यानगर यांच्या वतीने माजी सैनिक कै. आर. बी. तथा आप्पा घोडके स्मृती प्रतिष्ठान, महाराष्ट्र प्रांत आणि सूर्यतेज संस्था, कोपरगाव यांच्या विशेष सहकार्याने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सोमैया विद्या मंदिर, लक्ष्मीवाडी येथे योग प्रशिक्षण कार्यक्रम व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



या प्रसंगी जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील, सूर्यतेज संस्थेचे संस्थापक तथा स्वच्छतादूत सुशांत घोडके, केंद्रीय संचार ब्यूरोचे बबलूकुमार, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष देविदास पाचपाटील, मुख्याध्यापक संजय राऊत, योगतज्ञ प्रशिक्षक संतोष नलगे, महेश थोरात, रोहित काळे, पर्यवेक्षक बाबासाहेब खळदकर, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र आगलावे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी योग प्रशिक्षकांनी योगाचे महत्त्व विशद करत ओंकार उच्चारण, सूर्यनमस्कार, पद्मासन, उत्कटासन, पश्चिमोत्तानासन, ताडासन, वृक्षासन, बकासन, उत्तानपादासन, सर्वांगासन आणि हलासन यांसह विविध योगासनांची शास्त्रोक्त माहिती दिली. तसेच या आसनांची प्रात्यक्षिकेही सादर करण्यात आली. त्यानंतर ध्यान व प्रार्थनेने प्रशिक्षणाचा समारोप झाला.

यावेळी चित्रकला स्पर्धा तसेच योग प्रशिक्षणात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्रे आणि शालेय साहित्य देऊन गौरविण्यात आले.

### योगात उत्कृष्ट प्रात्यक्षिक सादर करणारे विद्यार्थी

■ रिता खंडू कचवे, श्रद्धा वैभव जांभूळकर, स्नेहल प्रकाश मते, प्रजोत सुनील रुपवते, टीपेंद्र लक्ष्मण यादव आणि अंश सिद्धार्थ गायकवाड.

कार्यक्रमाचे स्वागत मुख्याध्यापक संजय राऊत यांनी केले, तर प्रास्ताविक सुशांत घोडके यांनी केले. सूत्रसंचालन अनिता शिंदे यांनी केले.

ओंकार उच्चारण व गुरुमंत्राने कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा शिक्षक संजय अमोलिक, राम ढोकचौळे, रुपाली टेके, माधुरी गायकवाड, योगेश चव्हाण, बाळासाहेब जोरी यांच्यासह सोमैया विद्या मंदिर येथील शिक्षक-शिक्षिकांनी विशेष परिश्रम घेतले. लक्ष्मीवाडीसारख्या ग्रामीण भागात योग प्रशिक्षण कार्यक्रम प्रथमच आयोजित करण्यात आल्याने विद्यार्थी आणि पालकांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले.

### चित्रकला स्पर्धा निकाल

■ **लहान गट (इयत्ता ५ वी ते ७ वी)**

प्रथम - अंशुमन संजय धुमाळ
द्वितीय - साई जालिंदर ठाकरे
तृतीय - आराध्या अमर झिंजुर्डे
उत्तेजनार्थ - हर्षदा आण्णासाहेब शेळके, धनश्री संदीप काळे

■ **मोठा गट (इयत्ता ८ वी ते १० वी)**

प्रथम - प्रिती अनिल अहिरे
द्वितीय - असिया अभिन शेख
तृतीय - बुशारा अजीज सय्यद
उत्तेजनार्थ - रोहिणी वैभव कुलकर्णी, दिपाली विजय मुंगसे

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

## SPOT NEWS



### पोलीस पाटील संघाच्या महिला आघाडी जिल्हा अध्यक्षपदी प्रणाली धुमाळ

**● अकोले । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य गावकामगार पोलीस पाटील संघाच्या वतीने आळंदी येथे आयोजित कार्यक्रमात आ. बाबाजी काळे तसेच पोलीस पाटील संघाचे राज्याध्यक्ष बाळासाहेब शिंदे यांच्या हस्ते अहिल्यानगर जिल्हा महिला पोलीस पाटील आघाडीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी धुमाळवाडी गावच्या आदर्श पोलीस पाटील सौ. प्रणालिताई प्रशांत धुमाळ यांच्याकडे सोपविण्यात आली. याप्रसंगी पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा तृतीताई मांडेकर व कार्याध्यक्षा रोहिणीताई हांडे यांनी राज्य संघाच्या वतीने प्रणालिताई धुमाळ यांचा सत्कार केला. या कार्यक्रमास जिल्ह्यातील पोलीस पाटील सविताताई गायकर, सुरेखाताई शेटे, शिवाजीराव जोशी, गोपीनाथराव ढगे, किसनराव आरोटे, दत्तात्रेय वाकचौरे, रामदास तिकांडे, बाळासाहेब पवार, चंद्रभान भांगरे, अशोकराव केदार, शांताराम तळपे, गोरक्षनाथ शिंदे, बबनराव बिन्नर, नारायण डोंगरे, शिवाजी हांडे, विकास गोडसे, राजू वायाळ, गणेश पवार, दारकू कचरे, शिवराम पटेकर आदी पोलीस पाटील तसेच युवा कार्यकर्ते प्रशांत धुमाळ उपस्थित होते.

# पाथर्डी तालुक्यातील ग्रामीण भागात पुन्हा बिबट्यांची दहशत

## केळवंडी येथे दोन शेळ्यांवर हल्ला । मोहरी परिसरात पिंजरा लावला, वनविभागाचे सतर्कतेचे आवाहन

**● पाथर्डी । वीरभूमी –**

तालुक्यात पुन्हा बिबट्यांची दहशत वाढली असून वनविभागाकडून याबाबत पुरेसे गांभीर्य दाखवले जात नसल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांची रात्रीची झोप उडाली असून पाळीव जनावरांचे संरक्षण कसे करायचे, याची चिंता वाढली आहे.

चार वर्षांपूर्वी मढी परिसरात बिबट्याने धुमाकूळ घालत एका बालिकेचा बळी घेतला होता. त्यावेळी वनविभागाने मोठी यंत्रणा राबवून आठ ते दहा दिवसांत बिबट्याला जेरबंद केले होते. मात्र त्यानंतरही तालुक्यातील डोंगराळ भागात एक–दोन बिबट्यांचा वावर असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास येत होते.

सध्या मोहरी परिसरातील डोईफोडे वस्ती परिसरातील डोंगराळ भागात चार बिबट्यांचा वावर असल्याचे सांगितले जात आहे. तसेच रांजणी, केळवंडी, चेकेवाडी, मढी, शिरापूर, करडवाडी, घाटशिरस, चितळी, पाडळी, मांडवे, करंजी, भोसे, लोहसर आणि जोड मोहोज या भागांतही बिबट्यांचा वावर असल्याची माहिती आहे. दोन दिवसांपूर्वी केळवंडी शिवारात



ग्रामस्थांच्या समोरच बिबट्याने दोन शेळ्यांवर हल्ला केला. त्यापैकी एक शेळी ठार करून फस्त केली, तर दुसरी गंभीर जखमी झाली, अशी माहिती शेतकरी महादेव आठरे यांनी दिली.

माणिकदौंडी घाट परिसरातील डोंगराळ भागात रात्रीच्या वेळी अनेक वाहनचालकांनाही बिबट्याचे दर्शन झाल्याचे सांगण्यात येत आहे. मोहरी व महिंद्रा परिसरात बिबट्याचे कुटुंब वास्तव्याला असून डोंगर–दऱ्यांमध्ये त्यांचा मुक्काम आहे. शिकारीसाठी बाहेर पडताना संपूर्ण कुटुंबच बाहेर पडत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. अलीकडच्या काळात डोईफोडे वस्ती व परिसरातील नागरिकांना या बिबट्यांच्या कुटुंबाचे दर्शन झाले आहे. त्यामुळे भीतीच्या वातावरणात दिवसा देखील समूहाने वावरण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

वनविभागाला विविध गावांतील नागरिकांकडून वेळोवेळी माहिती दिली जात असली, तरी कर्मचाऱ्यांकडून केवळ सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या जात असल्याची नागरिकांची तक्रार आहे. प्रत्यक्षात तातडीने मदत मिळत नसल्याचा अनुभव नागरिक व्यक्त करीत आहेत. सध्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे अनेक शेतांमध्ये पिके नसली, तरी दुभती जनावरे आणि साठवून ठेवलेल्या चाऱ्यामुळे शेतकऱ्यांना शेतात वावरावे लागत आहे. काही ठिकाणी विहिरींमध्ये उपलब्ध असलेल्या अल्प पाण्यावर भाजीपाला व चारा पिके घेतली जात आहेत.

चितळी, पाडळी, कासार पिंपळगाव आणि हनुमान टाकळी परिसरात उसाची पिके असल्याने त्या भागात बिबट्याचा वावर नेहमीच दिसून येत आहे. त्यामुळे सायंकाळनंतर वस्तीवर जाताना नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. मढी, घाटशिरस, मायंबा आणि धामणगाव परिसरात भाविकांचा अहोरात्र वावर असतो. या भागातही रात्रीच्या वेळी बिबट्याचे दर्शन झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

याबाबत वनविभागाचे अधिकारी बबनराव मंचरे यांनी सांगितले की, मोहरी परिसरातील नजल वस्ती येथे पिंजरा लावण्यात आला आहे. डोंगराळ व दऱ्याखोऱ्यांचा भाग असल्याने बिबट्याचा वावर असणे शक्य आहे. केळवंडी येथे बिबट्याच्या हल्ल्यात एक शेळी ठार झाल्याने त्याचा पंचनामा करण्यात आला आहे. नागरिकांनी सतर्कता बाळगावी, निर्जन भागात एकट्याने जाऊ नये. या परिसरात एक–दोन बिबटे वावरत असावेत. गावोगावी वनविभागाच्या कर्मचाऱ्यांमार्फत माहिती घेतली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

# श्रीगोंदा पोलिसांची सलग चौथ्या दिवशी वाहनांवर दंडात्मक कारवाई

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा शहर व परिसरात विना नंबर प्लेट तसेच आवश्यक कागदपत्रांशिवाय फिरणाऱ्या दुचाकी वाहनांविरोधात श्रीगोंदा पोलिसांनी विशेष मोहीम राबवत मोठी कारवाई केली आहे. चोरीच्या वाहनांचा शोध घेण्यासाठी ही मोहीम सुरू करण्यात आली असून चार दिवसांत तब्बल १८७ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.



पोलिसांना गोपनीय माहितीदारामार्फत माहिती मिळाली होती की, काही आरोपी चोरीच्या वाहनांवरील नंबर प्लेट काढून त्या वाहनांचा वापर करत आहेत. त्यानुसार दिनांक १७ जून ते २० जून या कालावधीत श्रीगोंदा शहरात विशेष तपास मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान विना नंबर प्लेट असलेल्या दुचाकी वाहनांची तपासणी करण्यात आली. ज्या वाहनांवर नंबर प्लेट नव्हती अशी एकूण १८७ वाहने पोलीस स्टेशन येथे आणण्यात आली. वाहनांचे आरसी बुक, चेसिस नंबर, इंजिन नंबर तसेच वाहन परवाना यांची पडताळणी करण्यात आली. आवश्यक कागदपत्रांची खात्री झाल्यानंतर वाहनांना जागीच नंबर प्लेट बसवून दंडात्मक कारवाई करण्यात आली व १६९ वाहने सोडून देण्यात आली.

मात्र, उर्वरित १८ वाहनधारकांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न केल्याने संबंधित वाहने पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्यात आली आहेत. १७ जून रोजी ५६ वाहनांवर कारवाई, १ लाख ८ हजार ५०० रुपयांचा दंड, १८ जून रोजी ४७ वाहनांवर कारवाई, १ लाख १० हजारांचा दंड, १९ जून रोजी ५४ वाहनांवर कारवाई, १ लाख ५ हजार रुपयांचा दंड तर २० जून रोजी ३० वाहनांवर कारवाई, ३० हजार रुपयांचा दंड असा मिळून एकूण एकूण १८७ वाहनांवर कारवाई करून ३ लाख ५० हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

श्रीगोंदा शहर व पोलीस स्टेशन हद्दीतील नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, ज्या वाहनांना पुढील व मागील बाजूस नंबर प्लेट नाहीत त्यांनी तात्काळ नंबर प्लेट बसवून घ्याव्यात. अन्यथा अशा वाहनांवर मोटार वाहन कायद्यान्वये दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याची सूचना पोलिसांनी दिली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे व पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन लिमकर, पोहेकॉ अभय काळे, पोकॉ. आजिनाथ जाधव, पोकॉ गोरख जाधव व होमगार्ड यांनी पार पाडली.

# अश्विनी अंचवले यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार प्रदान

**● शेवगाव । वीरभूमी–**

अभिनय क्षेत्रात आपल्या प्रतिभेचा ठसा उमटविणाऱ्या शेवगाव येथील अभिनेत्री अश्विनी अंचवले यांनी मराठी रंगभूमीवर शेवगावचे नाव उज्ज्वल केले आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने दरवर्षी प्रदान करण्यात येणाऱ्या स्व. गोविंद बल्लाळ देवल स्मृती पुरस्कारांतर्गत त्यांना प्रायोगिक नाट्य विभागातील ‘सर्वोत्कृष्ट अभिनेत्री’ पुरस्काराने गौरविण्यात आले.




मुंबई येथील यशवंत नाट्यगृहात झालेल्या पुरस्कार सोहळ्यात सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी आणि सतीश लोटके यांच्या हस्ते अश्विनी अंचवले यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. या गौरवामुळे शेवगावच्या सांस्कृतिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

संदीप दंडवते लिखित ‘अय’ या प्रायोगिक नाटकातील अश्विनी अंचवले यांनी साकारलेल्या प्रभावी भूमिकेची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. संवेदनशील अभिनय, प्रभावी संवादफेक आणि भूमिकेतील बारकावे यांमुळे त्यांनी रसिकांच्या मनावर विशेष छाप पाडली.

अश्विनी अंचवले या शेवगाव येथील बाळासाहेब भारदे हायस्कूलच्या माजी विद्यार्थिनी आहेत. शालेय जीवनापासूनच त्यांना अभिनयाची आवड असून त्यांनी विविध बालनाट्यांमधून आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात केली. पुढे नाट्यक्षेत्रात सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर त्यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली.

शासनाच्या राज्य नाट्य स्पर्धेतही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत विभागीय तसेच अंतिम फेरीत रौप्यपदक पटकावले आहे. प्रायोगिक रंगभूमीवरील सातत्यपूर्ण आणि दर्जेदार कामाची पोचपावती म्हणून मिळालेला हा पुरस्कार त्यांच्या कलाप्रवासातील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# तारकेश्वर गडावरील गोशाळेची राज्यातील ‘प्रति गोकुळ’ म्हणून सर्वत्र चर्चा

## सुमारे २२५ देशी गाईंचे संगोपन, गावोगाव तयार होत आहेत गोसेवक । महंत आदिनाथ शास्त्री महाराजांच्या सेवाकार्यातून उभी राहिली अनोखी परंपरा

**● पाथर्डी । वीरभूमी–**

कत्तलीसाठी जाणाऱ्या गाईंचे पालकत्व स्वीकारून त्यांचे संगोपन करण्याच्या सेवा कार्यातून मोठ्या प्रमाणावर गोसेवक तयार होत आहेत. गावोगावचे भाविक ठरवून दिलेल्या दिवशी श्री क्षेत्र तारकेश्वर गडावर येऊन सुमारे २२५ देशी गाईंची सेवा व गोशाळेची स्वच्छता करतात. भाविकांच्या सेवाभावी सहभागातून चालणारी ही राज्यातील एकमेव गोशाळा असून, गोसेवकांचे चालते–बोलते विद्यापीठ म्हणून गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराज यांच्याकडे पाहिले जाते. गडावर असताना महाराज स्वतः एक ते दोन तास गोसेवा कार्यात सहभागी होतात. त्यामुळे श्री क्षेत्र तारकेश्वर गड येथील ही वैशिष्ट्यपूर्ण व आगळीवेगळी गोशाळा राज्यात चर्चेचा विषय ठरली आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या विशेष प्रयत्नातून देशी गाई व गोवंशाचे संरक्षण, संवर्धन व पूजन व्हावे यासाठी गोहत्या बंदी कायदा संमत करण्यात आला. कायद्यातील पळवाटांचा आधार घेत काही प्रमाणात गोहत्या सुरू असल्या तरी, गेल्या दहा–पंधरा वर्षांत राज्यात गोशाळांची संख्या वाढल्यामुळे मोठ्या प्रमाणात गाईंचे संरक्षण होत आहे. मात्र, या गाईंचे पालन–पोषण कसे करायचे, हा मोठा प्रश्न गोशाळा चालकांसमोर कायम आहे. चारा–पाण्यासाठी देणगी देण्याचे आवाहन करत, तसेच शेणखत व गोमूत्राची विक्री करून मोठी कसरत करत गोवंशाचे संगोपन करण्याचा प्रयत्न राज्यभरातील गोशाळा चालकांकडून सुरू आहे. शासनाकडून निकष पूर्ण करणाऱ्या गोशाळांना काही दिवसांपूर्वी अनुदान देण्यासही सुरुवात झाली आहे.

धर्मशास्त्र व आरोग्यशास्त्राबरोबरच देशी गाय हा श्रद्धेचा विषय मानला जातो. धर्मग्रंथांनुसार गाईमध्ये हिंदू धर्मातील ३३ कोटी देव–देवतांचा अंशात्मक अधिवास असल्याचे मानले जाते. विविध रोगांवर गोमूत्र चिकित्सा लाभदायक ठरल्याचा दावा केला जातो, तसेच गाईच्या दुधात सुवर्ण अंश असल्याने त्याला पूर्ण अन्न म्हणून ओळखले जाते. हिंदुत्ववादी



संघटनांचे प्रयत्न, गोसेवकांकडून होणारी सेवा आणि राज्य सरकारची भूमिका यामुळे गोपालन व गोरक्षणाचे कार्य वाढत आहे.

श्रीक्षेत्र तारकेश्वर गड भौगोलिकदृष्ट्या आष्टी तालुक्यात असला, तरी पाथर्डीपासून अवघ्या १२ किलोमीटर अंतरावर असल्याने सर्व व्यवहार पाथर्डी येथे चालतात. वैकुंठवासी वेदांताचार्य नारायण महाराज यांनी गडाची स्थापना केली. त्यानंतर आदिनाथ शास्त्री महाराज यांनी मठाधिपती म्हणून कारभाराची धुरा सांभाळली. कीर्तन–प्रवचनातून धर्मजागृती व संघटन कार्य करण्याबरोबरच नव्या पिढीला सेवा कार्याकडे प्रवृत्त करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न सुरू केले. राम मंदिर स्थापना सोहळ्यातही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

सुमारे पंधरा वर्षांपूर्वी त्यांनी गोशाळेची स्थापना केली. लोकश्रद्धेचा विषय हाताळत सर्वांना या कार्यात सहभागी करून घेत गावोगावी गोसेवक कसे वाढतील यावर त्यांनी भर दिला. हिंदुत्ववादी विचारांचा जाहीर पुरस्कार करत धर्मकार्य करणाऱ्या महंतांमध्ये आदिनाथ शास्त्री महाराज यांच्यासारखे मोजकेच महंत आता गोसेवेकडेही वळाले आहेत. गोमाता म्हणजे राष्ट्रमाता असून मानवी अस्तित्वाशी या विषयाचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष संबंध येतो, अशी त्यांची भूमिका आहे. वातावरणातील नकारात्मक ऊर्जा निष्प्रभ करण्यासाठी अधिकाधिक गोमाता असाव्यात, या उद्देशाने त्यांनी हे कार्य हाती घेतले. राज्यभर गोशाळा सुरू करण्यासाठी अनेकांनी पुढाकार घेतला; मात्र गोसेवकांची आणि गोसंवर्धनाच्या विचारांची पिढी घडविण्याचे कष्टसाध्य कार्य आदिनाथ शास्त्री महाराज यांनी हाती घेतले आहे. या कार्यात ॲड. नामदेव जायभाय यांचेही विशेष सहकार्य लाभत आहे. तारकेश्वर गडाचा आदेश मानून परिसरातील निवडक गावांतील नागरिक आणि भाविक सेवा कार्यासाठी उत्साहाने गडावर येतात. गोमाता व गोशाळेची सेवा करून ते गडावरील महाप्रसाद गृहात भोजन घेतात आणि परत जातात. या सेवाभावी वृत्तीमुळे नव्याने गोसेवा कार्यात सहभागी होणाऱ्या भाविकांना प्रेरणा मिळते. अशा सेवा कार्यातून जबाबदारीने काम करणाऱ्या तरुणांची संख्या वाढत असून, तारकेश्वर गडावरील गोसेवा प्रशिक्षण आणि सेवाभाव यामुळे ही चळवळ विस्तारत आहे. नगर, शेवगाव, राहुरी, पाथर्डी आणि आष्टी तालुक्यातील विविध गावांतील भाविकांचा या कार्यात सहभाग आहे. राज्यात असा उपक्रम एकमेव असून, गोसेवा विषयक कार्यासाठी देशपातळीवर आदर्श उपक्रम म्हणून येथील गोशाळेच्या कार्याचा निश्चितच उल्लेख होऊ शकतो. गोसेवकांच्या सेवाभावी वृत्तीमुळे भाविक तारकेश्वर गडाला प्रति गोकुळ म्हणून संबोधतात. गडाचा निसर्गरम्य, शांत आणि आध्यात्मिक ऊर्जेने परिपूर्ण परिसर येथे येणाऱ्या भाविकांच्या मनाला शांती देणारा ठरतो. गोमातांचे दर्शन झाल्यानंतर कृतकृत्य झाल्याची भावना अनेक भाविकांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसून येते.

# श्रीगोंदा बाजारतळ बारवेवरील ऐतिहासिक शिलालेखाचा शोध

**'थोर कसबा' म्हणून श्रीगोंद्याचा उल्लेख | जलव्यवस्था, स्थापत्यकला आणि लोकहितकारी परंपरेचा महत्त्वपूर्ण ऐतिहासिक पुरावा**

■ **विजय उंडे**

● **श्रीगोंदा | वीरभूमी –** श्रीगोंदा शहरात मुख्य रस्त्यालगत गावाच्या वेशीशेजारी असलेल्या बाजारतळावरील नंदा प्रकारच्या बारवेवर दोन शिलालेख आढळून आले आहेत. बारवेच्या पायऱ्या उतरतानाच्या डाव्या बाजूस एक शिलालेख असून दुसरा समोरील भिंतीच्या वरच्या भागात कोरलेला आहे. हे दोन्ही शिलालेख उठाव स्वरूपातील असून सहा ओळींचे, देवनागरी लिपीतील मराठी भाषेतील आहेत. अनेक वर्षे उघड्यावर असल्याने वातावरणाच्या परिणामामुळे काही अक्षरे पुसट झाली आहेत. मात्र, शिलालेखांचे छाप घेतल्यानंतर त्यावरील मजकूर स्पष्टपणे वाचता आला.

**शिलालेख वाचन क्रमांक १**

**१. श्री शांतादुर्गा म्हाळ**
**२. सा प्र. चरणी त.**
**३. विठ्ठल सुत भग**
**४. वंतराव निरं**
**५. तर भृगवार...**

**अर्थ :** श्री शांतादुर्गा म्हाळसा हिच्या चरणी विठ्ठलसुत भगवंतराव हे कायम तत्पर आहेत, असा आशय या लेखातून व्यक्त होतो.

**शिलालेख वाचन क्रमांक २**

**१. ।।श्री:।। श्री शांतादुर्गा म्हाळसा प्रसन्न**
**२. सत्रासे नृप शालिवाहन शक अठरावे व**
**३. स्छरि ।। नामे नळ वस्छरांतर नभि जे शु।।**
**४. दुर्गा बरि ।। तो हा श्रीगोंदे थोर कसबा जे**
**५. न्याये निष्ठुरता ।। विठलसुत भगवंत रा ।।**
**६. व रचेना वापि नवि निर्मिता ।। १ ।।**

**शिलालेखाचा अर्थ :** श्री शांतादुर्गा म्हाळसा हिच्या चरणी निष्ठा असलेले कसबे श्रीगोंदा येथील न्यायात प्रवीण असलेले विठ्ठलसुत भगवंतराव यांनी शालिवाहन शक १७१८, नळनाम संवत्सर, भाद्रपद शुद्ध प्रतिपदा अर्थात शुक्रवार, १ सप्टेंबर १७९६ रोजी श्रीगोंदा येथे पिण्याच्या पाण्यासाठी ही नवी बारव (वापी) बांधल्याची नोंद या शिलालेखात करण्यात आली आहे.

या शिलालेखांचे संशोधन राजेश पोपट इंगळे यांनी केले असून शिलालेखांचे वाचन शिलालेख अभ्यासक अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे.



श्रीगोंदा (जि. अहिल्यानगर) येथील बाजारतळावरील बारवेवरील हे शिलालेख स्थानिक इतिहास, जलव्यवस्था, सामाजिक जीवन आणि स्थापत्य परंपरेचे महत्त्वपूर्ण पुरावे मानले जात आहेत. या लेखांमधून तत्कालीन श्रीगोंदा परिसरातील नागरी विकासाची स्पष्ट कल्पना येते.

शिलालेखाच्या प्रारंभी श्री शांतादुर्गा म्हाळसा प्रसन्न असा मंगलाचरणाचा उल्लेख आढळतो. यावरून त्या काळातील धार्मिक श्रद्धा, स्थानिक देवतांची उपासना आणि समाजजीवनातील धर्माचे स्थान स्पष्ट होते. मध्ययुगीन महाराष्ट्रातील अनेक शिलालेखांमध्ये देवतांच्या स्मरणाने प्रारंभ करण्याची परंपरा आढळून येते.

या लेखातील श्रीगोंदे थोर कसबा हा उल्लेख विशेष महत्त्वाचा आहे. कसबा म्हणजे त्या काळातील प्रशासकीय, व्यापारी आणि लोकवस्तीचे महत्त्वाचे केंद्र. थोर कसबा या शब्दप्रयोगावरून श्रीगोंदा हे त्या काळात विकसित आणि महत्त्वाचे नगरकेंद्र असल्याचे दिसून येते. बाजारपेठ, व्यापार, लोकवस्ती आणि सामाजिक व्यवहार यांमुळे या ठिकाणाला विशेष स्थान प्राप्त झाले होते. शिलालेखातील वापी नवी निर्मिता हा उल्लेख बारव बांधकामाची स्पष्ट नोंद करतो. बारव ही केवळ पाण्याची सोय नसून तत्कालीन समाजाच्या जलव्यवस्थापन कौशल्याचे उत्कृष्ट उदाहरण होती. पिण्याचे पाणी, प्रवाशांची सोय, धार्मिक कार्ये आणि दैनंदिन वापरासाठी अशा जलरचना उभारल्या जात असत. त्यामुळे ही बारव तत्कालीन सार्वजनिक सुविधा आणि लोककल्याणकारी स्थापत्याचा महत्त्वपूर्ण पुरावा ठरते.

शिलालेखात विठ्ठलसुत भगवंत या व्यक्तीचा उल्लेख आढळतो. यावरून बारव बांधण्याचे कार्य एखाद्या स्थानिक प्रतिष्ठित व्यक्तीने किंवा दात्याने केले असल्याचे दिसते. अशा नोंदींमधून समाजातील व्यक्ती स्वत:च्या संपत्तीचा उपयोग सार्वजनिक हितासाठी करत असल्याची परंपरा अधोरेखित होते. हा लेख स्थानिक दानधर्म, सामाजिक जबाबदारी आणि लोकहिताच्या भावनेचा महत्त्वपूर्ण पुरावा मानला जातो.

या शिलालेखांचे संशोधन राजेश पोपट इंगळे यांनी केले असून वाचन शिलालेख अभ्यासक अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे. शिलालेखांचे शोधकार्य, छाप व छायाचित्रणासाठी शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश इंगळे यांच्यासह गणेश कुदांडे, मारुती वागस्कर, दिगंबर भुजबळ आणि सचिन भोसले यांनी सहकार्य केले.

### बारव म्हणजे तत्कालीन जल-अभियांत्रिकीचा उत्कृष्ट नमुना

■ इतिहासाच्या दृष्टीने ही बारव अत्यंत महत्त्वाची मानली जाते. बारव बांधणे म्हणजे दगडी बांधकाम, पाणी साठवण, उतरणीची रचना आणि दीर्घकालीन उपयोग लक्षात घेऊन केलेले नियोजन होय. त्यामुळे या रचनेतून तत्कालीन स्थापत्यज्ञान आणि जल-अभियांत्रिकीच्या प्रगतीचे दर्शन घडते. शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनने श्रीगोंदेकरांना सोबत घेऊन १ सप्टेंबर १७९६ रोजी बांधण्यात आलेल्या या पिण्याच्या पाण्याच्या बारवेची ऐतिहासिक स्मृती जपावी.

– **अनिल दुधाणे,** शिलालेख वाचक, पुणे

# राष्ट्रीय ब्रास बॅण्ड स्पर्धेत संजीवनी सैनिकी स्कूलला देशात प्रथम क्रमांक; महाराष्ट्राची शान वाढविली

**मंत्री दादाजी भुसे | संजीवनीच्या शिष्टमंडळाशी चर्चेदरम्यान गौरवोद्गार**

● **कोपरगाव | वीरभूमी–** ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालय आणि शिक्षण मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय ब्रास बॅण्ड स्पर्धेच्या भव्य महाअंतिम फेरीत संजीवनी सैनिकी स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या ब्रास बॅण्ड पथकाने पश्चिम भारत विभागाचे प्रतिनिधित्व करत प्रथम क्रमांक पटकावला. या यशामुळे देशपातळीवर शाळेची गुणवत्ता व शिस्त सिद्ध झाली असून महाराष्ट्राची शान वाढली आहे, असे गौरवोद्गार शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी काढले.



संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसचे विश्वस्त सुमित कोल्हे यांच्या पुढाकाराने संजीवनीच्या शिष्टमंडळाने शालेय शिक्षण मंत्री श्री दादाजी भुसे यांच्या 'जंजिरा' या शासकीय निवासस्थानी नुकतीच भेट घेतली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री नितीनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संजीवनी सैनिकी स्कूलमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची तसेच संस्थेच्या विविध उपलब्धींची माहिती सुमित कोल्हे यांनी दिली. यावेळी मंत्री श्री. भुसे यांनी संजीवनीच्या कार्याची प्रशंसा केली.

सुमित कोल्हे यांनी सांगितले की, संजीवनी परिवाराने गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षणासोबतच शिस्त, नेतृत्व, राष्ट्रीय मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी यांचा समन्वय साधणारी शिक्षणसंस्कृती विकसित केली आहे.

यावेळी मंत्री श्री. भुसे यांनी महाराष्ट्र शासनाच्या नव्या शैक्षणिक धोरणांतर्गत जिल्हा परिषद शाळांमध्ये सैनिकी प्रशिक्षणाचे घटक समाविष्ट करण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या प्रशिक्षित कॅडेट्सनी परिसरातील जिल्हा परिषद शाळांना भेटी देऊन तेथील विद्यार्थ्यांना प्राथमिक परेड व सैनिकी शिस्तीची मूलभूत तत्त्वे शिकवावीत, अशी सूचना त्यांनी केली. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, राष्ट्रप्रेम, नेतृत्वगुण आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या सूचनेची अंमलबजावणी करण्याची ग्वाही सुमित कोल्हे यांनी दिली.

या भेटीदरम्यान सैनिकी शाळा चालविताना संस्थांना भेडसावणाऱ्या विविध प्रशासकीय व पायाभूत अडचणींबाबत सविस्तर चर्चा झाली. यावर मंत्री श्री. भुसे यांनी राज्यातील सैनिकी शाळांच्या विकासासाठी शासन स्तरावर आवश्यक ते सर्व सहकार्य व मदत करण्याचे आश्वासन दिले.

मंत्री दादाजी भुसे यांच्या भेटीदरम्यान सुमित कोल्हे यांच्यासह उपप्राचार्य के. एल. दरेकर आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

# एस.एस.जी.एम. महाविद्यालयाच्या विकासाला नवी गती; क्रीडा सुविधांच्या उन्नतीसाठी विविध प्रस्तावांना मंजुरी

● **कोपरगाव | वीरभूमी–** येथील एस. एस. जी. एम. महाविद्यालयात महाविद्यालय विकास समितीचे नवनियुक्त अध्यक्ष ॲड. संदीप वर्पे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा महत्त्वाचा घटक असलेल्या क्रीडा क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी विविध विकासात्मक निर्णय घेण्यात आले.



विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महाविद्यालयातील क्रीडा सुविधांच्या उन्नतीसाठी विविध प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. बैठकीत मंजूर करण्यात आलेले हे विषय पुढील कार्यवाही व अंतिम मान्यतेसाठी संस्थेकडे सादर करण्यात आले आहेत. त्यामध्ये बास्केटबॉल मैदानाच्या नूतनीकरणासह कबड्डी, कुस्ती, ज्युडो आदी खेळांसाठी आधुनिक आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे, रनिंग ट्रॅकचे आधुनिकीकरण करणे.

जंपिंग पिटची दुरुस्ती, जिमखाना हॉलची देखभाल व दुरुस्ती तसेच मल्टी-जिम उपकरणांचे अद्ययावतीकरण या कामांचाही विकास आराखड्यात समावेश करण्यात आला आहे. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार, सुरक्षित आणि स्पर्धात्मक क्रीडा वातावरण उपलब्ध होणार आहे.

महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच पायाभूत सुविधा व क्रीडा विकासालाही समान प्राधान्य देण्याची भूमिका संस्थेची असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यावर भर दिला जात आहे.

बैठकीस महाविद्यालय विकास समितीचे सचिव प्राचार्य डॉ. माधव सरोदे, सदस्य मा. श्री. सुनील गंगुले, बाळासाहेब आव्हाड, महेंद्रशेठ काले, डॉ. बंडेराव तऱ्हाळ, डॉ. माधव यशवंत, डॉ. देविदास रणधीर, डॉ. प्रतिभा रांधवणे, डॉ. निलेश मालपुरे तसेच कार्यालय अधीक्षक सुनील गोसावी आदी उपस्थित होते.

# टाहाकारी जिल्हा परिषद शाळेतील ९० विद्यार्थ्यांना मोफत स्कूल कीटचे वाटप

**ॲप्रोच हेल्पिंग हँड्स फाउंडेशन व रामनारायण बुब ट्रस्टचा उपक्रम | दुर्गम व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत**

● **अकोले | वीरभूमी–** वंचित, उपेक्षित आणि दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक सुलभ व गुणवत्तापूर्ण व्हावे, यासाठी अनेक सेवाभावी संस्था सातत्याने कार्यरत आहेत. अशाच सामाजिक बांधिलकीतून कार्य करणाऱ्या ॲप्रोच हेल्पिंग हँड्स फाउंडेशन, पुणे आणि श्री व श्रीमती रामनारायण बुब ट्रस्ट, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने अकोले तालुक्यातील पेसा क्षेत्रातील दुर्गम टाहाकारी येथील जिल्हा परिषद शाळेतील ९० विद्यार्थ्यांना मोफत स्कूल कीटचे वितरण करण्यात आले.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी १५ जून रोजी शाळेत प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या चिमुकल्यांची गावातून आनंददायी फेरी काढण्यात आली. शाळेत आगमन होताच विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन जल्लोषात स्वागत करण्यात आले. त्यानंतर आयोजित सभेत विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, शालेय गणवेश तसेच स्कूल कीटचे वितरण करण्यात आले.

आदिवासी व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी ही मदत विशेष महत्त्वाची ठरली. सध्याच्या महागाईच्या काळात पालकांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला असून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. या स्कूल कीटमध्ये आकर्षक व टिकाऊ शालेय बॅग, पाण्याची बाटली, विविध प्रकारच्या वह्या, चित्रकला वही, रंगपेटी, अक्षर सुधार पाटी, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व वाढविणारी पुस्तिका तसेच विद्यार्थ्यांची स्वयंअध्ययन क्षमता विकसित करणारी दर्जेदार स्वाध्याय पुस्तिका यांचा समावेश करण्यात आला.

शाळेच्या प्रशस्त प्रांगणात आयोजित या कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित ग्रामस्थ, पालक, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच बादशहा एखंडे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, शिक्षकांची तळमळ आणि विद्यार्थ्यांमधील अष्टपैलू गुणांचे मनापासून कौतुक केले. केंद्रप्रमुख रोहिणी खतोडे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून शाळा प्रवेशासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष एखंडे, केरू महाराज केदार, उत्तम एखंडे, सतीश एखंडे, विठ्ठल एखंडे, भाऊपाटील एखंडे, ज्येष्ठ मार्गदर्शक आण्णासाहेब एखंडे, उमाजी मेंगाळ व सुभाष एखंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव भांगरे यांनी केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक अनिल पवार यांनी केले, तर नव्याने केंद्रप्रमुखपदी नियुक्त झालेले उपक्रमशील शिक्षक गोकुळ सर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या सांगता समारंभात गावातील प्रतिष्ठित उद्योजक पाटीलबुवा भगवंता एखंडे यांनी विद्यार्थ्यांना गोड जेवण देऊन आनंदात भर घातली.